# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)

## (महाविद्यालयीन विभाग)

डॉ. एस.एम.रोकडे
संचालक (प्रभारी)


जा.क्र./ गो.वि /महा.वि./5075 /२०१६
दिनांक : 9 /०२/२०१६

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य
सर्व संलग्नित अध्यापक व शारिरीक शिक्षण महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :–राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी गठीत समितीला प्रस्ताव सादर करण्याबाबत..

संदर्भ :–शासन निर्णय क्र. शुल्क–२०१५/प्र.क्र.४३४/१५/मशि–२ दि. १९ जानेवारी, २०१६

मा. महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित बि.एड./एम.एड./बी.पी.एड या महाविद्यालयांनी या पत्रासोबत संलग्नित संदर्भिय शासन निर्णय दि. १९ जानेवारी, २०१६ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांनी शुल्क निर्धारणाबाबतचे प्रस्ताव शिक्षण शुल्क समितीस सादर करण्याबाबत कार्यवाही घ्यावी.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली


एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२२३३२२ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 86 दि. 3/2/16
जावक क्र. 132 दि. 5/2/16

**राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 8038 दिनांक 6/2/16
जावक क्र. ........ दिनांक ........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. 2205 दिनांक 4-02-2016
जावक क्र. 1085 दिनांक 6/02/16

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: शुल्क-२०१५/प्र.क्र.४३४/१५/ मशि-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १९ जानेवारी, २०१६.

<u>वाचा</u> :- (१) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली अधिसूचना क्र.एफ नं.५१-३/२००९/ पीटी/एनसीटीई (एन अॅन्ड एस), दिनांक २५ ऑगस्ट, २०१०.

(२) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.३९/१८ (र.व.का.), दिनांक १४ ऑगस्ट, २०१३.

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शुल्क-२०१२/प्र.क्र.१८३/१२/मशि-२, दिनांक ५ जुलै, २०१३.

BCUD Circulate

<u>प्रस्तावना</u> :-

श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या निर्णयानुसार राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद (एनसीटीई) नवी दिल्लीच्या संदर्भ क्र.१ येथील दिनांक २५ ऑगस्ट, २०१० रोजीच्या अधिसूचनेन्वये विहित करण्यात आलेल्या शुल्क निर्धारण समितीच्या रचनेप्रमाणे संदर्भ क्र.३ येथील दिनांक ५ जुलै, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विना अनुदानित/कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमधील बी.एड/ एम.एड अभ्यासक्रमांच्या शुल्क निर्धारणासाठी स्वतंत्र शिक्षण शुल्क समिती गठीत करण्यात आली आहे. संदर्भ क्र.२ येथील दिनांक १४ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसुचनेन्वये "शारिरीक शिक्षण महाविद्यालये" हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रम देखील राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद (एनसीटीई) नवी दिल्लीच्या मान्यतेने चालविण्यात येत असल्याने विना अनुदानित/ कायम विनाअनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड / एम.पी.एड अभ्यासक्रमांच्या शुल्क निर्धारणासाठी, दिनांक ५ जुलै, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या रचना व कार्यकक्षेमध्ये अंशत: बदल करुन एकच शिक्षण शुल्क समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

राज्यातील विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड/एम.एड व विना अनुदानित/कायम विना अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांमधील बी.पी.एड/एम.पी.एड या अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण, दि.०५.०७.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या शिक्षण शुल्क समितीकडून करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२.	त्यानुसार दिनांक ०५.०७.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, गठीत करण्यात आलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या रचनेमध्ये व कार्यकक्षेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. :-

**(अ) समितीची रचना :-**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव, वित्त विभाग किंवा त्यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | Institutional Finance,. Cost Accountancy And Economics मधील दोन तज्ञ व्यक्तींना नामनिर्देशनाने<br>१. प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य महाविद्यालय, मुंबई.<br>२. एक सनदी लेखापाल | सदस्य |
| ४ | १. खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचा एक प्रतिनिधी नामनिर्देशनाने (शिक्षणशास्त्र)<br>२. खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचा एक प्रतिनिधी नामनिर्देशनाने (शारिरीक शिक्षणशास्त्र.) | सदस्य |
| ५ | सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई. | सदस्य |
| ६ | संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य सचिव |

**(ब) नामनिर्देशित सदस्यांचा कार्यकाल** :- सदर शिक्षण शुल्क समितीतील नामनिर्देशित सदस्यांचा कार्यकाल नियुक्तीच्या दिनांकापासून तीन वर्षाचा राहील.

**(क) समितीची कार्यकक्षा** :- सदर समिती, राज्यातील अकृषि विद्यापीठांशी संलग्नित विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड/एम.एड या अभ्यासक्रमांसह राज्यातील अकृषि विद्यापीठांशी संलग्नित विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड/एम.पी.एड अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण करील.

**(ड) समितीच्या जबाबदाऱ्या :-**

१. राज्यातील अकृषि विद्यापीठ क्षेत्रातील प्रत्येक विना अनुदानित/कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क लागू करण्यासंबंधी सूत्र तयार करणे व त्यास योग्य प्रमाणात प्रसिध्दी देणे,

२ शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी कार्यपध्दती विहित करणे,

३ दरवर्षी शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी वेळापत्रक जाहीर करणे,

४ विहीत मुदतीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर न केल्यास विलंब कालावधीसाठी दंडात्मक शुल्क आकारणीचे दर विहीत करणे,

५ संबंधित महाविद्यालयाचे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यासाठी सदर संस्थेची स्थापना, कार्यक्षेत्र, शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम, विद्यार्थी संख्या व त्यासंदर्भात राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद(एनसीटीई) नवी दिल्ली/शासन इत्यादी यांनी विहित केलेले निकष याची माहिती प्राप्त करुन घेणे.

६. शैक्षणिक अभ्यासक्रम राबविण्याच्या पध्दती, कार्यभार व त्यावरील नियुक्त्या, परीक्षा पध्दती व त्यावरील खर्चाची माहिती घेणे व पुढील पाच वर्षातील संस्थेच्या विकासात्मक कार्याची माहिती घेणे, यासाठी योग्य ती कार्यपध्दती विहीत करणे.

७. महाविद्यालयांनी, सादर केलेल्या प्रस्तावात दिलेली माहिती ही वस्तुस्थितीनुरुप असल्याबाबतची खातरजमा करुन / प्रस्तावाची तपासणी करुन विहीत करण्यात आलेल्या सुत्रानुसार संबंधित संस्था / महाविद्यालयांतील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांचे शुल्क एक महिन्याच्या आत निश्चित करणे.

८. शुल्क प्रमाणित करताना शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयाकडून उपलब्ध झालेल्या माहितीची पडताळणी करुन शुल्क निश्चिती करणे, मात्र यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास वा वाद निर्माण झाल्यास तपासणी पथकामार्फत प्रत्यक्ष तपासणी करुन वस्तुस्थितीनुसार तक्रार निवारण करण्याचे अधिकार शासनाकडे असतील.

९. महाविद्यालयांनी प्रस्तावित केलेल्या व समितीने निश्चित केलेल्या शुल्काची अंमलबजावणी संस्थांनी करुन त्याचा अहवाल शासनास, विद्यापीठास, संबंधित आयोगास, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद(एनसीटीई) नवी दिल्ली इत्यादींना कळविल्याची खात्री करणे व एक प्रत समितीकडे ठेवणे.

१०. समितीने निश्चित केलेले शुल्क हे पुढील तीन वर्षासाठीच लागू राहील. त्यानंतर पुढील कालावधीसाठी हे शुल्क पुन्हा निश्चित करुन घ्यावे लागेल.

**(इ) शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून शिक्षण शुल्क समितीने आकारावयाचे शुल्क :-**

राज्यातील मान्यताप्राप्त विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांनी शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क निश्चित करताना समितीकडे नोंदणी करणे आवश्यक असून त्यापोटी भरावयाच्या नोंदणी शुल्काचे दर खालीलप्रमाणे राहतील:-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | संस्था / विद्यापीठाचे ठिकाण | नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|
| १ | शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) | राज्यातील महाविद्यालये | रु.३०,०००/- |
| २ | शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम.एड) | राज्यातील महाविद्यालये | रु.४५,०००/- |
| ३ | शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) / पदव्युत्तर पदवी (एम.एड) | इतर राज्यातील महाविद्यालये | रु.२,००,०००/- |
| ४ | शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) / पदव्युत्तर पदवी (एम.एड) | विदेशी संस्था / विद्यापीठे | रु.५,००,०००/- |
| ५ | शारिरीक शिक्षण पदवी (बी.पी.एड) | राज्यातील महाविद्यालये | रु.३०,०००/- |
| ६ | शारिरीक शिक्षण पदव्युत्तर पदवी (एम.पी.एड) | राज्यातील महाविद्यालये | रु.४५,०००/- |
| ७ | शारिरीक शिक्षण पदवी (बी.पी.एड) / पदव्युत्तर पदवी (एम.पी.एड) | इतर राज्यातील महाविद्यालये | रु.२,००,०००/- |
| ८ | शारिरीक शिक्षण पदवी (बी.पी.एड) / पदव्युत्तर पदवी (एम.पी.एड) | विदेशी संस्था / विद्यापीठे | रु.५,००,०००/- |

३. त्यानुसार राज्यातील विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांनी शुल्क निर्धारणाबाबतचे प्रस्ताव विहित मुदतीमध्ये शिक्षण शुल्क समितीस सादर करणे आवश्यक राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११११६४७२६२६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(रोहिणी भालेकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१.मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२.मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

३.प्रधान सचिव, (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई,

४.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

५. महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर,

६. महालेखापाल,(लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर,

७.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

८. संचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. सह संचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई.
११. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
१२. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव,
१३. सर्व प्राचार्य, शारिरीक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत)
१४. सर्व प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत)
१५. शिक्षण शुल्क समितीचे सर्व पदसिध्द व नामनिर्देशित सदस्य (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत)
१६. मान्यताप्राप्त कायम विनाअनुदानित महाविद्यालये संघटना (शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र) (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत)
१७.मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१८. मा. राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१९. प्रधान सचिव ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२०. निवड नस्ती (मशि-२).